# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.),
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, ता. जि. ठाणे - ४०१ १०१

जा. क्र. मि.भा./मनपा/नर/३८३८/२०१५-१६ दिनांक :- ३१/१२/२०१५.

प्रति,

अधिकार पत्रधारक - मे. आर.एन.ए. बिल्डर्स (एन.जी.)

द्वारा - सल्लागार अभियंता - मे. भरतकुमार पटेल

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे - नवघर सर्वे क्र./ हिस्सा क्र. नवीन ११६/४ जुना ४२०/४ या जागेत नियोजित बांधकामास बांधकाम प्रारंभपत्र मिळणेबाबत.

संदर्भ :- १) आपला दि.१८/११/२०१५ चा अर्ज.

२) मे. सक्षम प्राधिकारी नागरी संकुलन ठाणे यांचेकडील आदेश क्र. यु.एल.सी./टिए/भाईंदर/एसआर-५४३, दि.१०/०७/१९९१ अन्वये कलम ८(४) चे आदेश, यु.एल.सी./टी.ए/एटीपी/डब्ल्यु.एस.एच.एस.-२०/एस.आर-३३८, दि.१८/०३/२००५ ची मंजुरी व यु.एल.सी./टी.ए /एटीपी/डब्ल्यु.एस.एच.एस.-२०/पुर्नजिवीत/एस.आर-३३८, दि.१५/११/२००७ अन्वये पुर्नजिवीत आदेश, यु.एल.सी./टिए/एटीपी/कलम-२०/मुदतवाढ/एसआर-३३८/१७५, दि.१५/०५/२०१५ अन्वये मुदतवाढ.

३) मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडील अकृषिक परवानगी आदेश क्र. महसुल/क-१/टे-१/एनएपी/एसआर-७२, दि.२७/०३/२००८.

४) दी इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनी प्रा.लि. यांचेकडील पत्र क्र. आरई/५०१, दि.०१/०६/०४ अन्वये नाहरकत दाखला.

५) अग्निशमन विभागाकडील पत्र क्र. मनपा/अग्नि/९०३/२०१४-१५, दि.०२/११/२०१५ अन्वये तात्पुरता नाहरकत दाखला.

६) या कार्यालयाचे पत्र क्र. मिभा/मनपा/नर/१५३५/२०१५-१६, दि.१४/०७/२०१५ अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी.

## -: सुधारीत बांधकाम प्रारंभपत्र :- (सुधारीत नकाशे मंजुरीसह) (फक्त जोत्यापर्यंत) (विकास हक्क प्रमाणपत्राच्या वापरासह)

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ४४, ४५ अन्वये व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३ ते २६९ विकास कार्य करण्यासाठी / बांधकाम प्रारंभपत्र मिळण्यासाठी आपण विनंती केले नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे नवघर सि.स.नं./सर्वे क्र./हिस्सा क्र. नवीन ११६/४ जुना ४२०/४ या जागेतील रेखांकन, इमारतीचे बांधकाम नकाशांस खालील अटी व शतींचे अनुपालन आपणाकडून होण्याच्या अधीन राहून ही मंजूरी देण्यात येत आहे.

१) सदर भुखंडाचा वापर फक्त बांधकाम नकाशात दर्शविलेल्या रहिवास वापरासाठीच करण्याचा आहे.

२) सदरच्या बांधकाम परवानगीने आपणास आपल्या हक्कात नसलेल्या जागेवर कोणतेही बांधकाम करता येणार नाही.

